SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004. MAHARASHTRA
PHONE : EPABX - 2609000 GRAM : UNISHIVAJI
FAX : 0091-0231-2691533 & 0091-0231-2692333
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४. महाराष्ट्र
दूरध्वनी (ईपीएबीएक्स) २६०९००० (संलग्नता विभाग - २६०९०८९, २६०९१३६)
तार : युनिशिवाजी फॅक्स : ००९१-०२३१-२६९१५३३, २६९३२९४ व २६९२३३३.
B Accredited By NAAC

जा.क्र. संलग्नता/टे.१/API/वंगार/ 125

दिनांक 3 0 NOV 2013

प्रति,
मा. अध्यक्ष/ प्राचार्य,
सर्व संस्था व संलग्न महाविद्यालये.

**विषय :-** प्राचार्य पदासाठीच्या API अर्हतेबाबत.
**संदर्भ :-** विद्यापीठाचे पत्र क्र. शिवि/पीजीबीयुटीआर/एपीआय/१२५२६ दि.२६.०३.२०१३ चे परिपत्रक

महोदय/ महोदया,

उपरोक्त विषय संदर्भात आपणास आदेशानुसार कळविण्यात येते की, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि. ३० जून २०१० च्या अधिसूचनेनुसार महाविद्यालयातील प्राचार्य पदाकरीता API गुणांक आवश्यक करण्यात आला आहे. त्यानुसार API साठी उपरोक्त संदर्भ पत्रानुसार अर्ज मागविण्यात आले होते. परंतु प्राचार्य पदासाठी पात्र असलेल्या शिक्षकांची यादी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी जन्मतारीख, प्रवर्ग इत्यादी आवश्यक असल्याने. API प्रस्ताव सादर करतांना आपल्या संस्थेतील/ महाविद्यालयातील शिक्षक/प्राचार्य यांचे खालील प्रमाणे कादपत्रांची पुर्तता करून प्रस्ताव पाठवावेत.

१. संस्था/ महाविद्यालयाचे अध्यक्ष /प्राचार्य यांनी प्राचार्य/ शिक्षक यांचे API प्रस्ताव सादर कारतांना प्राचार्य/शिक्षक यांची माहिती खरी व बरोबर असलेचे प्रमाणपत्र देवून प्रस्ताव संस्था अध्यक्ष/प्राचार्य यांचेमार्फतच पाठवावेत.

२. सोबत प्रमाणपत्र सादर करावयाचा मसुदा जोडला आहे. त्यानुसार संस्था/ महाविद्यालयाच्या लेटरहेडवर प्रमाणपत्र देण्यात यावे.

३. प्राचार्य/शिक्षक यांनी शैक्षणिक अर्हतेसंदर्भातील सर्व कागदपत्रे (गुणतक्ते व प्रमाणपत्रे) तसेच जन्मतारखेसाठी SSC प्रमाणपत्र, प्रवर्गसाठी जात प्रमाणपत्र /जात वैद्याता प्रमाणपत्र इ. कागदपत्रे सोबत जोडून API प्रस्ताव सादर करावा.

४. प्राचार्य/शिक्षक यांनी नियुक्ती संदर्भातील उभी व अडवी मान्यतेबाबतची सर्व कागदपत्रे व सहायोगी प्राध्यापक म्हणून मान्यता मिळालेली स्थाननिश्चिती/ वेतननिश्चितीची कागदपत्रे सोबत जोडून API प्रस्ताव सादर करावा.

५. प्रस्ताव पाठवितांना संदर्भिय पत्रातील मागदर्शक सुचना अवलोकनार्थ घेवून त्यानुसार प्रस्ताव पाठवावेत.

आपला विश्वासू,

संचालक
महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ

(टिप :- सदरचे पत्र व नियमावलीबाबतची (तक्ते व परिशिष्ठ) सर्व माहिती विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर BCUD - Circular या ठिकाणी उपलब्ध आहे)

# CERTIFICATE

**This is to certify that Dr./Shri./Smt. ....................................................**

**is working as the Principal/ Professor/ Asso. Professor/ Asst. Professor in the institution/ College since ...................... and accordingly I am sending herwith the proposal for to workout API.**

**He/ She is willing to get API worked out for the post of Principal. The documents/ certificates attached herewith and information given in the proposal by him/her are verified by me and found correct.**

**Chairman /Principal**